# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/10/2023 (रविवार) सायंकाळ

---

## चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत १४ किमी अंतरावर मौजा शेत शिवार येथे दिनांक २६/१०/२०२३ ते दि. २७/१०/२०२३ चे १४.०० वा. दरम्यान महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. उपविभाग पारशिवनी यांचे लघुदाब वाहीनीचे १) ए.एन.टी.कंडक्टर १२६० मीटर किंमती २९२३२/— रू २) जि.एन.ए.टी कंडक्टर ४२० मिटर किंमती ५१५८/— रू ,सिमेंट पोल ०१ नग किंमती २३७६/—रू अशा एकुण ३४३९०/—रू चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— महेंद्र काशिराम हेडाउ (कनिष्ठ अभियंता) वय ४५ वर्ष, रा. दहेगाव जोशी महावितरंण कार्यालय पारशिवनी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी आकरे हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. सावनेर**:— फिर्यादी यांनी दिनांक २८/१०/२०२३ रोजी पोलीस स्टेशनला येवून तक्रार दिली की, त्यांची मुलगी वय १७ वर्षे हीची डिसेंबर सन २०२० पासून शुभम राजू राजपुत, वय २२ वर्ष याचे सोबत ओळखी झाले पासून आरोपीने त्यांचे घरी येवून फिर्यादीला तुमची मुलगी घरी आहे का? असे विचारून फिर्यादीच्या मुलीने फोन करून बोलावले असे खोटे सांगून फिर्यादीचे मुलीला मानसीक त्रास दिला. तसेच फिर्यादीची मुलगी ही शेतात जातांना, वस्तीत असतांना आरोपीने तिचे जवळ जाण्यासाठी तीचा वारंवार पाठलाग केला व दिनांक २८/१०/२०२३ रोजी मध्यरात्री ००.३० वाजता दरम्यान शुभम राजपुत हा फिर्यादीचे घराचे आवारातील संडास मध्ये घुसून फिर्यादीच्या मुलीला तु मला मॅसेज केला म्हणून मी येथे आलो. असे म्हणून तीचे तोंड दाबून तीला पकडून ठेवून तिचे सोबत छेडखानी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ ड भादवि सहकलम १२ पोक्सो कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास म.स.पो.नि. एम एम मोकाशे .पो.स्टे. सावनेर मो. नं. ८३८०८५०३५० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर